# Goa Staff Selection Commission

6th Floor, 3rd Lift, SPACES Building, Patto Plaza, Panaji-Goa – 403001
Website: gssc.goa.gov.in

No.1/36/2023-GSSC/330 Dated: 04/06/2024

## सीबीटीसाठी उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांना सुधारित सूचना

**सामान्य सूचना:**

1. उमेदवारांनी नमूद केलेल्या वेळेत नेमून दिलेल्या परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावे.
2. मोबाईल फोन किंवा इतर कोणत्याही प्रतिबंधित वस्तूंसह परीक्षा स्थळी प्रवेश करण्यापासून रोखण्यासाठी पोलीस कर्मचाऱ्याकडून उमेदवाराची तपासणी केली जाईल.
3. परीक्षा सुरू होण्याच्या नियोजित वेळेच्या 15 मिनिटे अगोदर परीक्षेच्या ठिकाणी प्रवेश बंद केला जाईल.
4. उमेदवारांनी परीक्षेच्या ठिकाणी **फक्त** खालील वस्तू सोबत घेऊन जाण्याचा सल्ला दिला जातो:
   a) नोंदणी केलेल्या उमेदवारांना ईमेलद्वारे पाठविलेल्या ई-प्रवेशपत्राची प्रिंट आउट. **उमेदवाराला ई-प्रवेशपत्राच्या हार्ड कॉपीशिवाय परीक्षा हॉलमध्ये प्रवेश दिला जाणार नाही.**

   b) **मूळ** फोटो ओळख पुरावा (आधार कार्ड/पासपोर्ट/पॅन कार्ड/ड्रायव्हिंग लायसन्स).

   c) दिव्यांग प्रमाणपत्र, लागू असल्यास.
5. रफ वर्कसाठी कागद :

a) परीक्षा हॉलमध्ये/रूममध्ये एक बॉल पॉईंट पेन आणि रफ वर्कसाठी 4-5 कोऱ्या पेपरशीट उपलब्ध करून दिल्या जातील.

b) उमेदवारांनी आपले नाव आणि अर्ज क्र. शीटच्या वरच्या बाजूला लिहावा आणि परीक्षा हॉलमधून/रूममधून बाहेर पडण्यापूर्वी **न चुकता** शीट्स परत कराव्यात..

6. **स्मार्टवॉच, कॅल्क्युलेटर, मोबाईल फोन, हेडफोन, डिजिटल डायऱ्या, पेजर, कॅमेरा, ऑडिओ/व्हिडिओ कॅसेट, कॉम्पॅक्ट डिस्क, एमपी3, फ्लॉपी डिस्क, फ्लॅश ड्राइव्ह, मेमरी स्टिक, ब्लूटूथ डिव्हाइस, लॅपटॉप किंवा टॅब्लेट कॉम्प्युटर, पोर्टेबल म्युझिक प्लेयर इ. किंवा इतर कोणतीही इलेक्ट्रॉनिक उपकरणे यांना परीक्षा हॉलमध्ये परवानगी नाही. परीक्षा हॉलमध्ये प्रवेश करण्यापूर्वी तुम्ही या वस्तू तुमच्या बॅगेत ठेवू शकता.**
7. गरज भासल्यास वैयक्तिक पारदर्शक पाण्याच्या बाटल्यांना परीक्षा हॉलमध्ये परवानगी दिली जाईल. (स्टीलच्या बाटल्यांना परवानगी नाही).
8. सीबीटीसाठी दिलेली पूर्ण वेळ संपेपर्यंत कोणत्याही उमेदवाराला परीक्षा हॉलमधून/रूममधून बाहेर पडण्याची परवानगी दिली जाणार नाही.
9. परीक्षेच्या शेवटच्या 30 मिनिटांदरम्यान कोणत्याही उमेदवाराला शौचालय वापरण्याची परवानगी दिली जाणार नाही.
10. सीबीटीनंतर कामकाजाच्या दुसऱ्या दिवशी आयोगाच्या संकेतस्थळावर अपलोड केलेला निकाल तात्पुरता असेल आणि तक्रार निवारण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच अंतिम निकाल प्रदर्शित केला जाईल. तक्रार निवारणासंदर्भातील सूचना, आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.
11. ई-प्रवेशपत्रात कोणतीही विसंगती असल्यास, उमेदवारांनी आयोगाला ईमेल पाठवून त्याची माहिती देणे आवश्यक आहे.

12. दृष्टिहीन उमेदवार, चलन विकलांगता व सेरेब्रल पाल्सी असलेले उमेदवार ज्यांची लेखनाची व टायपिंगची क्षमता कमकुवत आहे, दोन्ही हातांची समस्या असलेले उमेदवार व असे इतर दिव्यांग उमेदवार, स्थायी सूचनांनुसार पूरक वेळ/लेखनिक मिळविण्यास पात्र असतील.
13. आयोगाद्वारे परीक्षेच्या दिवशी लेखनिक उपलब्ध करून दिला जाईल. उमेदवारांना त्यांचे स्वतःचे लेखनिक ठेवण्याची परवानगी दिली जाणार नाही.
14. लेखनिकाच्या सुविधेची आवश्यकता असलेल्या सर्व दिव्यांग उमेदवारांनी, उमेदवाराच्या ई-मेलवर ई-प्रवेशपत्र मिळाल्यानंतर 2 कामकाजीय दिवसांच्या आत उमेदवाराच्या वैद्यकीय तपशीलांसह आयोगाला us.gssc@goa.gov.in वर कळवावे.
15. तथ्यांचा आढावा घेतल्यानंतर आयोग उमेदवाराला सूचना देऊन लेखनिक पुरवेल.
16. वरील सूचना काटेकोर अनुपालनासाठी आहेत आणि कोणत्याही सूचनांचे उल्लंघन केल्यास आणि परीक्षा केंद्रावर कोणत्याही अनुचित मार्गाचा वापर केल्यास, उमेदवार पुढीलसाठी जबाबदार असेल:
    a) ज्या पदासाठी तो/ती अर्जदार आहे त्या पदाच्या निवडीसाठी आयोगाकडून अपात्र ठरवण्यासाठी.
    b) आयोगाने घेतलेल्या कोणत्याही परीक्षेतून किंवा निवडीतून कायमस्वरूपी किंवा ठराविक कालावधीसाठी प्रतिरोधित करण्यासाठी आणि या प्रकरणात आयोगाचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक असेल.
    c) तो/ती आधीपासूनच सरकारी सेवेत असल्यास, योग्य नियमांनुसार शिस्तभंगाच्या कारवाईसाठी.

(शशांक व्ही. ठाकूर)
सचिव (जीएसएससी)

---